ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-II, Issue-I June 2013

# खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या संदर्भात अध्यापक शिक्षणाची भूमिका

**प्रा. वाघेरे पी.बी.**

**शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक.**

**प्रास्ताविक:**

समाजाचे सवरूप बदलते असून त्यात अनेक स्थित्यंतरे होत असतात. आजच्या माहिती आणि तंत्रज्ञान क्रांतीमूळे विविध क्षेत्रात नवनवीन बदल झपाट्याने होत आहेत. त्यामूळे ज्ञानाचा, लोकसंख्येचा वआकांक्षाचा प्रस्फोट होत आहे. या बदलांचा महत्त्वाचा भाग म्हणजे नवीन संकल्पनांचा उदय. वास्तविक 1991 पासूनच जागतिकीकरणाची बीजे आपल्या समाजात रुजू लगली. या नवीन संकल्पनांमध्ये उल्लेखनीय व वादग्रस्त संकल्पना खाजगीकरण त्याच प्रमाणे नवीन विचारांची उदार विचाराने देवाणघेवाण करणारी प्रक्रिया उदारीकरण,जागतिकीरण, खाजगीकरण व उदारीकरण या तिन्ही संकल्पनांनी भारताच्या विविध क्षेत्रात आमुलाग्र बदल घडवून आणाला आहे. उदा, शिक्षण क्षेत्र ,आर्थिक क्षेत्र, शेतकी क्षेत्र, सांस्कृतिक क्षेत्र इत्यादी.

21 व्या शतकातील नवीन शैक्षणिक आव्हाने समर्थपणे स्वीकारुन या नवीन आव्हानासंबंधीची भूमिका योग्य प्रकारे मांडली पाहिजे. चांगला शिक्षकच चांगले विद्यार्थी घडवू शकतो. सामाजिक दृष्ट्या जबाबदार उच्च मूल्ये व नैतिकतेचे अधिष्ठान असलेले व सांस्कृतिक वारसाची जाण असलेले शिक्षक तयार करण्याची भूमिका अध्यापक शिक्षणांची आहे. अध्यापक शिक्षण हे एक व्यावसायिक शिक्षण आहे. स्वामी विवेकानंदाच्या मते शिक्षणाचे ध्येये म्हणजे माणूस घडविणे होय. या शिक्षणाद्वारे माणूस घडविण्याची प्रक्रिया अध्यापक शिक्षणाद्वारे चालते. अध्यापक शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट एक चांगला सुसंस्कृत, मूल्ये जोपासणारा शिक्षण आधारस्तंभ निर्माण करणे हे आव्हान अध्यापक शिक्षणाचेच आहे.

**अध्यापक शिक्षणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी:**

प्राचीन काळी आश्रमातील गुरु, जेष्ठ विद्यार्थ्याला आपल्या मार्गदर्शनाखाली कनिष्ठ विद्यार्थ्याला कसे शिकवावे याचे अनुभव देत असे. सर अन्ड्रयू बेल या  शिक्षणतज्ज्ञाने ह्या पद्धतीचे अवलोकन करुन ती इंग्लंडमध्ये नेली. पुढे याचेच शास्त्रशुद्ध व पद्धतशीर रुप अध्यापक शिक्षण या नावाने इंग्रजांनी भारतात आणले.

ज्या अभ्यासक्रमांद्वारे आणि अनुभवांच्या माध्यमाने एखाद्या व्यक्तिला अध्यापकीय व्यवसायासाठी वा कार्यासाठी घडविले जाते त्या शिक्षणाला व अभ्यासक्रमाला अध्यापक शिक्षण असे म्हणतात.

शिक्षणाचे ध्येये विद्यार्थ्याचा सर्वांगिण विकास करणे ज्या मध्ये ज्ञानात्मक, भावात्मक आणि कारक कौशल्यांचा विकास व समन्वय अभिप्रेत आहे. हे शिक्षण अध्यापक शिक्षणाद्वारे दिले जाते. परंतु अध्यापक शिक्षणाची उद्‌दिष्ट्ये व नवीन संकल्पना यांचा परस्पर संबंध पाहणे आवश्यक ठरते.

**अध्यापक शिक्षणाची उद्‌दिष्ट्ये:**

1) बालकांच्या गरजा, तीव्र इच्छा, अभिवृत्ती यांचा शोध घेण्याच्या हेतूने बाल संशोधने निर्माण करण्याची क्षमता विद्यार्थी अध्यापकांमध्ये निर्माण करणे.
2) विविध स्तरावरील विद्यार्थ्यांच्या विकासासंबंधी तसेच समाजाच्या विकासासंबंधी गरजांचे आकलन होण्यास मदत करणे.
3) शाळांना स्वयंशासीत, सृजनशील व सहकार्य समुदाय म्हणून संघटीत करण्याची क्षमता निर्माण करणे.
4) छात्राध्यापकास योग्य सुधारित शैक्षणिक साधनांचा शिक्षणासाठी उपयोग करण्याची क्षमता निर्माण करणे.
5) बालकांच्या गरजेनुसार गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने उपचारात्मक अध्यापन प्रक्रियेचे कार्यक्रम तयार करण्याची क्षमता निर्माण करणे.
6) व्यक्तिचा नागरिक म्हणून विकास होण्यास आंतरदृष्टीने आकलन करुन देणे.
7) व्यक्तिगत भिन्नता जाणण्याची व व्यक्तिगत शिक्षण देण्याची क्षमता निर्माण करणे.

वरील उद्‌दिष्ट्ये साध्यकरण्यासाठी पुढील कार्ये अध्यापकास करणे आवश्यक आहे.

- ❖ भावी पिढीची जडण घडण संस्कारांद्वारे करुन देणे.
- ❖ नैतिक मूल्यांची जोपासणा करणे व रुजविणे.
- ❖ व्यक्तिमत्वास सर्वांगाने आकार देणे.
- ❖ संस्कृती व सभ्यता यांचे जतन व संवर्धन करणे.
- ❖ समाजसेवा व देशसेवा करण्यासाठी त्यामध्ये वृत्ती निर्माण करणे.
- ❖ वैचारिक व आचारणात्मक आदर्श ठेवणे.

उद्‌दिष्ट्ये साध्य करण्याकरिता अध्यापक शिक्षणातील प्रक्रिया समजावून घेवून अध्यापक शिक्षणाने खालीलप्रकारची कार्याचा उहापोह केला पाहिजे.

1. **समाजात जन्माला येणारी भवी पिढीची योग्य जडण-घडण करुन संस्कारक्षम बनविणे-** खाजगीकरणामुळे बऱ्याच वेळा पाठाचे निरीक्षण त्यातून संस्कार कसे होतील या दृष्टीने अध्यापन केले पाहिजे परंतु असे न होता. परीक्षा, सातत्यपूर्ण मूल्यमापन, पाठाचे मार्गदर्शन या गोष्टीमूळे शिथीलता निर्माण होऊन योग्य अशा संस्काराची जडण घडण होत नाही. स्पर्धात्मक युग असल्यामुळे सतत विविध स्पर्धा हरएक क्षेत्रात स्पर्धा असल्याने मूळ उद्देश हा अध्यापक शिक्षण विसरुनच जात आहे.
2. **नैतिक मूल्याची जोपासना करणे व रुजविणे-** मूल्य जोपासना व संवर्धन करणारा शिक्षक घडवणे हे अध्यापक शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य आहे. परंतु खाजगीकरणाच्या प्रकियेमूळे मूळात स्वतःच अधिक पैसे मोजून प्रवेश घेणारा विद्यार्थ्यी शिक्षक आहे . यातच त्यामध्ये आपण घडवणारी,रूजविणारी मूल्ये या मध्ये तफावत आढळते म्हणूनच अध्यापक शिक्षणाचे कार्य व खाजगीकरण यांच्यामध्ये योग्य मेळ बसत नाही.
3. **व्यक्तिगत विकासास आकार देणे-** खाजगीकरणाचा विचार केल्यास शिक्षणशास्त्र महाविद्यालयांमध्ये होणारे विविध उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन बौध्दीक व कारक कौशल्यांवर आधारित विविध स्पर्धा, सहशालेय उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी पुरेसा वेळ तसेच वर्षभरातील विविध कामकाज वर्षेभर केलेल्या कामाचे नियोजन तसेच संघटीतपणाचा दिसून येणाऱ्या अभवामुळे खाजगीकरणाच्या रेट्यात उपक्रम राबविणे अशक्यच होऊन बसले आहे.
4. **संस्कृती व सभ्यता यांचे जतन व संवर्धन करणे-** समाजात चालत आलेली संस्कृतीचे संक्रमण करुन तिचे जतन होणे गरजेचे आहे. अध्यापक शिक्षणाने भावी पिढी समोर नेहमी सभ्येतेचे वर्तन केले पाहिजे. खाजगीकरणांतर्गत नियोजन बद्ध काम न झाल्यामूळे शिक्षणाचा दर्जा घसरतो. व्याख्याने न घेताच वर्ग चालविणे, एक प्रकारे आपण सभ्येतेचा व वैचारिक आचारणात्मक आदर्श ठेवू शकत नाहीत.
5. **समाजसेवा व देशसेवा करण्याची वृत्ती निर्माण करणे-** अध्यापक शिक्षणातून समाजसेवा व देशसेवा करणारी पिढी निर्माण केली पाहिजे ती पिढी या खाजगीकरणाच्या रेट्यात टिकून राहिली पाहिजे. मोठ्य संस्कारातून समाजसेवा व देशसेवा, देशाचे रक्षणाची जबाबदारीची जाणीव झाली पाहिजे. समाजसेवेतून परोपकार करण्याची वृत्ती जोपासली पाहिजे.
6. **विद्यार्थ्यांचा संर्वागिण विकास हे अध्यापक शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य आहे-** खाजगीकरणामुळे विद्यार्थ्याचा ज्ञानात्मक, भावात्मक व कारक कौशल्याचा विकास पूरेसा होत नाही. बारकावे, अचूक निरीक्षण, विविध सर्जनशिल पद्धती याबाबत अनभिज्ञ राहाण्याची वेळ विद्यार्थ्यांवर

येणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. विद्यार्थ्यांचा शारीरिक, बौध्दीक, भावनिक, सामाजिक, सांस्कृतिक विकास होण्याकरिता खाजगीकरणाचा परिणाम होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

**खाजगीकरणाच्या रेट्यात घ्यावयाची दक्षता:**

1) प्रत्येक विद्यार्थ्याला शाळा व महाविद्यालयामध्ये प्रवेश देताना प्रवेश हा पैशावर नसून तो गुणवत्तेवर देण्यात यावा.
2) समाजातील सर्व स्थरातील विद्यार्थ्यांकरिता सर्वसमावेशा प्रवेश परीक्षा घेण्यात यावी.
3) पालकांना व विद्यार्थ्यांना शाळेत योग्यप्रकारे समुपदेशन करुनच प्रवेश देण्यात यावा.
4) भारतातील नॅक सारख्या संस्थांनी कामकाजाचे मूल्यमापन करुनच शैक्षणिक संस्थाना अथवा महाविद्यालयांना दर्जा A,B,C देण्यात यावा.
5) शाळा महाविद्यालयांचे नियम योग्यरित्या कार्यान्वीत करण्यात यावेत.
6) सरकारी नियमांचे उल्लंघन न होता नियमांचे योग्यरित्या पालन करण्यात यावे.
7) महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे भावनिक संबंध जोपासून त्यांना योग्य प्रकारे सुविधा देण्यात याव्यात.

**उदारीकरण व खाजगीकरणाची संकल्पना:**

उदारीकरणाचा परिपाक म्हणजे जागतिकीकरण होय. उदारीकरण व जागतिकीकरण एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. दोघांचाही विचार एकत्रितपणे करणे अधिक उचित ठरेल.

उदारीकरण म्हणजे मुक्तपणे परकीयांना आपल्या देशात येऊन विचारांची देवाण-घेवाण उभयतांत करणे होय. जागतिकीकरण म्हटले की त्याचा संबंध आपल्या देशातील आर्थिक व्यापार व इतर देशाच्या आर्थिक बाबींशी करणे असे ग्राह्य धरणे.

उदारीकरण म्हणजे सरकारने समाजाचे जीवन नियंत्रित करण्यासाठी जे वेगवेगळे कायदे, नियम केलेले असतात ते हळू-हळू शिथील करत जाणे होय. उदारीकरण व खाजगीकरणाबरोबर जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरु होते म्हणजेच जगातल्या कोणत्याही व्यापाऱ्याला केव्हाही, कोठेही, कशाही आपल्या वस्तूचा व्यापार करता येणे होय.

शिक्षणक्षेत्रामध्ये जागतिकीकरण व उदारीकरणामुळे शिक्षणाची उद्‌दिष्ट्ये बदलेली आहेत. उदा. संश्लेषण, अनुकूलता, व्यावसायीकरण, अध्ययनाशी दुवा साधनारे ध्येये, स्वयंअध्ययन व सांघिक कार्य इ. उद्‌दिष्ट्ये बदलली गेली आहेत.

**जागतिकीकरण व उदारीकरणाचे फायदे व मर्यादाः**

1. भारतीय विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी परदेशात जावे लागणार नसून त्यास भारतातच नामांकित परदेशी विद्यापीठांच्या पदव्या ते संपादन करु शकतात.
2. परदेशी चांगल्या प्रतीचे शिक्षण घेण्यासाठी शैक्षणिक कर्जे, शिष्यवृती यांची माहिती इंटरनेटच्या माध्यमातून मिळत असते.
3. परदेशी विद्यापीठांच्या वर्तमान पत्रामध्ये दिल्या जाणाऱ्या जाहिराती बघून शिक्षणासंबंधी आवश्यक अर्हता समजली जाते.
4. शिक्षणाच्या गुणवत्तेत टिकून राहण्यासाठी बौध्दीक स्पर्धा वाढवून शिक्षणाची गुणवत्ता सुधारेल.
5. फक्त श्रीमंत विद्यार्थ्यांनाच किंवा इंग्रजी माध्यमांच्या विद्यार्थीच या शिक्षणाचा फायदा घेऊ शकतात.

**मर्यादाः**

1. परदेशी शिक्षण हे सर्व सामान्यासांठी अतिशय खर्चिक आहे.
2. निवडक अभ्यासक्रमांनाच महत्त्व लाभेल की ज्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक मान्यता आहे. त्यामुळे भारतीय शैक्षणिक अभ्यासक्रम ठरविण्यासाठी परावलंबत्व स्वीकारावे लागेल.
3. परकीय शिक्षणामुळे फक्त इंग्रजी माध्यमांचाच विद्यार्थी शिक्षण घेऊ शकेल. त्यामुळे भारतीय मातृभाषेला मर्यादा येतील.
4. यामुळे शिक्षणाची गुणवत्ता वाढून देखील अध्यापक शिक्षण हे एक व्यवसाय शिक्षण आहे. हे आपणास विसरुन चालणार नाही.
5. चांगले अध्यापक तयार करण्याचे काम भारतीय शिक्षण पद्धती करीत असून त्यांच्या अनुभवांना प्राधान्य दिले गेलेले आहे.
6. परदेशी अभ्यासक्रमातून भारतीयांचे संस्कार, मूल्ये, गाभाघटक व संस्कृतीचा ऱ्हास होण्याची भिती आहे.

**समारोपः**

जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरणाच्या या 21 व्या शतकात एक सुजाण, सुसंस्कृत व बदलत्या काळाची पावले ओळखणारा असा सजग नागरिक निर्माण करुन विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी अध्यापक शिक्षणाचा गुणात्मक दर्जा उंचविणे ही काळाची गरज आहे. कारण जग जवळ येत आहे पण जग जवळ येऊन उपयोग नाही. तर मन जवळ येणे आवश्यक आहे. मन जोडण्याचे काम अध्यापक शिक्षण करु शकते.